# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- द्रद्धःद्.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३०-२३** **दिनांक २७/०१/२०२३**

## नाबालिक मुलीचा विनयभंग करणाऱ्या अरोपीतास अटक - नवघर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक १९/०१/२०२३ रोजी नवघर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्यादी यांची ८ वर्षाची मुलगी ही राहते बिल्डींगच्या बाजुला असलेल्या बिल्डींगच्या दुकानातील गाळयात ठेवलेली शाळेची बॅग आणण्यासाठी गेली होती. सदर दुकानाच्या गाळयात ठेवले बॅग घेवुन फिर्यादी यांची मुलगी घरी येत असताना बिल्डींगच्या जिन्यामध्ये एका अनोळखी इसमाने तिची छेडछाड केलेबाबत फिर्यादी यांनी सांगितल्याने नवघर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I ४२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३५४,३५४ (ड) अनव्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांचे मार्गदर्शन व सुचनेप्रामणे नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थाला भेट देवुन तांत्रिक विश्र्णेषनाव्दारे अरोपीत नामे महेंन्द्र यादव, वय ५० वर्षे, रा. नवघर नाका, भाईंदर पुर्व यास दिनांक १९/०१/२०२३ रोजी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे निदर्शनास आल्याने त्यास वर नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, श्री. शशिकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मिलिंद देसाई, पो.नी. श्री. सुशीलकुमार शिंदे (गुन्हे), स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.निरी. अभिजीत लांडे, पो.हवा. भुषण पाटील, नवथाथ घुगे, सुरेश चव्हाण, पो. अंम. सुरज घुनावत, पो. अंम. ओंमकार यादव यांनी केली.

----ooo-----